**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार, दिनांक ३० ऑगस्ट २०२४**

**ठळक बातम्या**

1. **महायुती सरकार महाराष्ट्राला अग्रेसर ठेवण्यासाठी कट्टीबद्ध असल्याची मोदी यांची ग्वाही; पालघर जिल्ह्यातल्या वाढवण बंदरासह विविध विकास कामांचा पंतप्रधांनांच्या हस्ते प्रारंभ.**
2. **शहर आणि गावातली दरी दूर करुन आर्थिक समावेशनासाठी वित्तविषयक तंत्रज्ञानाने मोलाची कामगिरी बजावली असल्याचं पंतप्रधांनांचं 'ग्लोबल फिनटेक फेस्टमध्ये' प्रतिपादन.**
3. **दिव्यांगांसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापनेबाबत तातडीने प्रस्ताव तयार करण्याच्या उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या सूचना.**
4. **मतदार यादीच्या विशेष पुनर्नरीक्षण कार्यक्रमांतर्गत नागपुरात तब्बल 2 लाख पेक्षा जास्त मतदारांची नोंदणी.**
5. **नागपूर, यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये आज मुसळधार पावसाचा येलो अलर्ट.**

--------------------------------

वाढवण भूमिपूजन

पालघर जिल्ह्यात वाढवण इथं ७६ हजार कोटी रुपये खर्चून बांधण्यात येणाऱ्या बंदराचं भूमीपूजन, २१८ मत्स्यपालन विकास योजना यासह विविध विकास योजनांचं उद्घाटन आणि लोकार्पण आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालं. वाढवण हे आशिया खंडातलं हे सर्वात मोठं बंदर असेल आणि जगातल्या आघाडीच्या १० बंदरामध्ये याचा समावेश असेल. या बंदरामुळे १२ लाख लोकांना प्रत्यक्ष तसंच अप्रत्यक्ष रोजगार मिळणार आहे. दरम्यान, सिंधुदुर्ग मध्ये राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा पडल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज छत्रपती शिवाजी महाराज यांची माफी मागितली. शिवाजी महाराज हे आमच्यासाठी आराध्य दैवत आहेत. यामुळे ज्यांच्या भावना दुखावल्या त्यांचीही मी क्षमा मागतो, असं पंतप्रधान आज पालघर मध्ये म्हणाले. वाढवण बंदराचे भूमिपूजन आणि मत्स्योद्योगाशी निगडित विविध प्रकल्पांचे भूमिपूजन, अनावरण केल्यानंतर ते लोकांना संबोधित करत होते. केंद्रातील NDA सरकार आणि राज्यातील महायुती सरकार महाराष्ट्राला नव्या उंचीवर नेण्यासाठी कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार

पंतप्रधानांनी यावेळी केला. संपर्क व्यवस्था प्रस्थापित करण्यासाठीच्या ट्रान्सपॉन्डरचं यावेळी स्थानिक मच्छीमारांना मोदींच्या हस्ते वितरण करण्यात आलं. आजचा दिवस देशाच्या इतिहासातला सोनेरी दिवस आहे. हे वाढवण बंदर राज्यासाठी प्रगतीच नवं शिखर ठरेल, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले. वाढवण बंदर उभारणीचे प्रयत्न ३५ वर्षांपासून सुरू होते. बंदरामुळे कुणाचेही नुकसान होऊ देणार नाही, त्यामुळे गैरसमज होऊ देऊ नका, असं आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलं.

--------------------------------

मोदी फीनटेक

शहर आणि गावातली दरी दूर करुन आर्थिक समावेशनासाठी वित्तविषयक तंत्रज्ञानाने मोलाची कामगिरी बजावली असल्याचं पंतप्रधान  नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. वित्त आणि तंत्रज्ञान विषयक ग्लोबल फिनटेक फेस्ट ला आज मुंबईत ते संबोधित करत होते. गेल्या १० वर्षांत ३१ अब्ज डॉलरची गुंतवणूक फिनटेकमध्ये झाली असून फिनटेक स्टार्टअप्समध्ये ५०० टक्के वाढ झाल्याचं त्यांनी सांगितलं. बँक व्यवहारांचं संगणकीकरण झालं, गेल्या १० वर्षात ५३ कोटी जनधन खाती उघडली गेली त्यात २९ कोटींपेक्षा जास्त खाती महिलांची आहेत असं सांगून ते म्हणाले की फिनटेकमुळे महिला सक्षमीकरणालाही हातभार लागला आहे. थेट लाभ हस्तांतरण होत असल्याने भ्रष्टाचाराला जागा राहिली नाही, असं मोदी यांनी सांगितलं. भारतीय रिझर्व बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास आणि इन्फोसिसचे सहसंस्थापक क्रिश गोपालकृष्णन यांचीही भाषणं कार्यक्रमात झाली.जगभरातले जवळपास पन्नास टक्क्यांहून अधिक डिजिटल व्यवहार भारतात होत असून, भारताचं युपीआय हे ॲप, फिन्टेकचं जगभरातलं उत्तम उदाहरण असल्याचं त्यांनी नमूद केलं. इतर देशातले लोक भारतात येतात तेव्हा त्यांना सांस्कृतिक विविधतेसोबतच, आता फिन्टेक क्षेत्रातही विविधता दिसून येत असल्याचं पंतप्रधान म्हणाले.

--------------------------------

चंद्रकांतदादा पाटील

दिव्यांग बांधवांसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्यासाठी राज्य शासन सकारात्मक असून याबाबतचा प्रस्ताव तातडीने तयार करावा, अशा सूचना उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिल्या. आज मंत्रालयात दिव्यांग बांधवांसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापनेसंदर्भात आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या विद्यापीठाच्या माध्यमातून दिव्यांग विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध होतील, आणि त्यामुळे त्यांच्या कौशल्यांचा विकास होईल, विद्यापीठाचा प्रस्ताव

तयार करताना या विद्यार्थ्यांना शैक्षणिक पाठ्यक्रमांसोबतच विशेष प्रशिक्षण कार्यक्रम, संशोधन आणि इतर उपक्रमांमध्ये अधिकाधिक सहभागी होण्याची संधी उपलब्ध होईल असा प्रस्ताव तयार करावा. प्रस्ताव तयार झाल्यानंतर मंत्रीमंडळ बैठकीत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल असं मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले.

--------------------------------

शिवाजी महाराज पुतळा प्रकरण

सिंधुदुर्ग जिल्हयात राजकोट इथं शिवरायांचा पुतळा कोसळल्याची संपूर्णपणे चौकशी करून पुन्हा इथं महाराजांचं भव्यदिव्य स्मारक उभारलं जाईल, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटलं आहे. आज सकाळी राजकोट इथं या दुर्घटनास्थळाची पाहणी केल्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. ही घटना अतिशय दुर्दैवी आहे, मात्र याविषयी वाद घालणं योग्य नाही, नेते आणि कार्यकर्ते यांनी या विषयात सयंम दाखवावा, असं आवाहन पवार यांनी यावेळी केलं.दरम्यान, या दुर्घटनेनंतर शासनाने दोन तांत्रिक समित्या स्थापन करण्याची अधिसूचना जारी केली आहे. पहिली समिती दुर्घटनेची कारणमीमांसा करेल  तर दुसरी समिती ही त्याच ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा स्थापन करण्यासाठी तयार करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल झालेल्या दोघांपैकी चेतन पाटील याला काल कोल्हापुरातून अटक केली आहे. तर जयदीप आपटे फरार आहे.हा पुतळा बनवण्याचे कंत्राट मेसर्स आर्टिस्ट्री कंपनीला देण्यात आलं होतं. जयदीप आपटे हे या कंपनीचे मालक असून चेतन पाटील  सल्लागार आहेत.

--------------------------------

एकनाथ शिंदे

पुण्यात शिवाजीनगर इथं दूरशिक्षण तंत्रनिकेतन परिसरात उभारण्यात आलेल्या राज्यातल्या पहिल्या आतंरराष्ट्रीय कौशल्य प्रशिक्षण केंद्राचं उद्घाटन उद्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. राष्ट्रीय कौशल्य विकास महासंघ- एन एस डी सी इंटरनॅशनलच्या पुणे विभागाचे सहसंचालक डॉ.दत्तात्रय जाधव यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. या प्रशिक्षण केंद्रात पहिल्या टप्प्यात एनएसडीसी इंटरनॅशनल मार्फत आरोग्य, रूग्णालय, ब्युटी अँड वेलनेस आणि ग्रीन जॉब स्केल सेक्टर, सौर उर्जा या विभागातील प्रशिक्षण दिलं जाणार आहे.

--------------------------------

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

महाराष्ट्र विधान मंडळातल्या राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेतर्फे दिल्या जाणाऱ्या विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातल्या उत्कृष्ट संसदपटू आणि उत्कृष्ट

भाषण या पुरस्कारांचं वितरण येत्या ३ सप्टेंबर रोजी मुंबईत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते होणार आहे. वर्ष २०१९ ते २०२४ या कालावधीसाठी हे पुरस्कार दिले जातील. यावेळी 'वरिष्ठ सभागृहाची आवश्यकता आणि महत्त्व' या ग्रंथाचं प्रकाशन देखील करण्यात येईल, अशी माहिती विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी आज दिली.

---------------------------------

पुर्नरीक्षण

मतदार यादीच्या विशेष पुर्नरीक्षण कार्यक्रमांतर्गत नागपूर येथील 12 विधानसभा मतदारसंघ निहाय मतदारांची संख्या आज 30 ऑगस्ट रोजी प्रसिद्ध झालेल्या यादीनुसार 44 लाख 35 हजार 553 एवढी आहे. या वर्षीच्या 23 जानेवारी रोजी ही मतदार संख्या 42 लाख 33 हजार 605 होती. जिल्हा प्रशासनाने तब्बल 2 लाख पेक्षा जास्त मतदारांची नोंदणी केली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी आणि नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ.विपीन ईटनकर यांनी नागपूर इथं पत्रकार परिषदेत दिली.

---------------------------------

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

देशाच्या आर्थिक विकासात शेतकऱ्यांचं योगदान अमूल्य आहे. सध्या अनेक कारणांनी इथेनॉल, मिथेनॉल, बायोडिझेल सीएनजी चर्चेत आहे. कृषीनिवीष्ठेपासून तयार होणाऱ्या या ऊर्जेमुळे भविष्यात अनेक सकारात्मक बदल घडणार आहे. म्हणूनच शेतकरी हा अन्नदाता तर आहेच पण ऊर्जादाता सुद्धा असल्याचं प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी आज केलं. ते आज अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते.

---------------------------------

राष्ट्रीय समाज पक्ष

राष्ट्रीय समाज पक्षाचा वर्धापनदिन सोहळा अकोल्यात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी देशभरातून शेकडो पदाधिकारी आणि कार्यकर्ते कार्यक्रमाला उपस्थित होते. यावेळी संस्थापक अध्यक्ष महादेव जानकर यांनी उपस्थितीतांना मार्गदर्शन केलं. महाराष्ट्रातील 288 जागा स्वबळावर लढणार असल्याचंहि त्यांनी सांगितलं.अकोल्यात आयोजित एकविसाव्या वर्धापन दिनानिमित्त त्यांनी कार्यकर्त्यांना पक्ष बांधणीकडे लक्ष देऊन आपले उमेदवार निवडून आणण्यासाठी जोरदार प्रयत्न करण्याचं आवाहन केलं.

--------------------------------

हवामान

हवामान- नागपूर, यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये आज मुसळधार पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. नागपुर जिल्ह्यात आज सकाळपासून अनेक ठिकाणी अल्प कालावधीसाठी मेघगर्जनेसह पाऊस पडला. उद्या अमरावती, चंद्रपूर, गोंदिया आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडू शकतो. एक सप्टेंबर रोजी चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्याला मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. येत्या काही तासांत भंडारा, नागपूर आणि चंद्रपूर इथं तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. दरम्यान, अरबी समुद्रात ईशान्येकडे 'असना' हे चक्रीवादळ तयार होत आहे. सध्या निर्माण झालेलं कमी दाबाचं क्षेत्र गुजरातच्या पश्चिम-नैऋत्य दिशेला दाखल झालं असून, येत्या १२ तासांमध्ये त्याचं चक्रीवादळात रूपांतर होईल, अशी शक्यता भारतीय हवामान शास्त्र विभागानं वर्तवली आहे. मान्सूनमध्ये चक्रीवादळ तयार होणं ही दुर्मीळ बाब असून, याआधी १९६४ साली ऑगस्ट महिन्यात अरबी समुद्रात चक्रीवादळ तयार झालं होतं. सुरुवातीला हे चक्रीवादळ पश्चिम-नैऋत्येकडे आणि त्यानंतर कच्छ किनाऱ्याकडे सरकेल. कच्छच्या किनाऱ्यावरून हे चक्रीवादळ ईशान्य अरबी समुद्रात पाकिस्तानच्या दिशेनं सरकेल अशी शक्यताही हवामान विभागानं वर्तवली आहे.

--------------------------------